# Rajapur Varsa



## सुसज्ज अंगणवाडी - विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाऊंडेशनच्या पुढाकारातून चार अंगणवाड्यांचे लोकार्पण

**रत्नागिरी :** फिनोलेक्स कंपनीला ४५ वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने ग्रामीण भागातील बालकांना सुरक्षित, आनंददायी, प्रेरणादायी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पोषक वातावरण मिळावे, या उद्देशाने फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सीएसआर उपक्रमांतर्गत मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे रत्नागिरीतील ग्रामीण भागात अंगणवाडी नूतनीकरणाचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. हा उपक्रम मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ. रितू प्रकाश छाब्रिया आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे एक्झिक्युटिव्ह चेअरमन श्री. प्रकाश प्रल्हाद छाब्रिया यांच्या दूरदृष्टीतून आणि मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आज गोळप आणि कोळंबे परिसरातील चार नूतनीकरण केलेल्या अंगणवाड्यांचे लोकार्पण करण्यात आले. यामध्ये गोळप मोहल्ला (उर्दू माध्यम) अंगणवाडी, कोळंबे मधील वाकीवाडी,



मांडवकरवाडी आणि गोरीवलेवाडी या अंगणवाड्यांचा समावेश आहे. या अंगणवाड्यां मध्ये इमारतीची आवश्यक दुरुस्ती आणि नूतनीकरण, आकर्षक रंगकाम, बालकांना ज्ञानवर्धक माहिती देणाऱ्या बोलक्या भिंती तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्य आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे बालकांना अधिक सुरक्षित, स्वच्छ, आनंददायी आणि शिक्षणास पोषक वातावरण मिळणार आहे. यासोबतच गोळप -दाभिळवाडी आणि कोळंबे-बागवाडी येथील आणखी दोन अंगणवाड्यांचे नूतनीकरणाचे काम तिसऱ्या टप्प्यात सुरु आहे. उपक्रमाच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यांत आतापर्यंत एकूण १७ अंगणवाड्यांचे नूतनीकरण पूर्ण करण्यात आले असून त्यांचे लोकार्पण करण्यात आले आहे. यापूर्वी फणसोप, रनपार, गोळप, पावस आणि कोळंबे परिसरातील १३ अंगणवाड्यांचे नूतनीकरण करून त्या बालकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. बालविकासाची पायाभरणी अंगणवाडीतूनच होत असल्याने या प्रकल्पाच्या माध्यमातून जुन्या आणि आवश्यक दुरुस्तीची गरज असलेल्या अंगणवाड्यांना नवसंजीवनी देण्यात येत आहे. स्वच्छ व सुंदर परिसर, सुधारित पायाभूत सुविधा, आकर्षक बोलक्या भिंती आणि बालमैत्रीपूर्ण वातावरण यामुळे बालकांच्या शिक्षणासोबतच त्यांच्या बौद्धिक, शारीरिक, सामाजिक आणि भावनिक विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. सौ. रितू प्रकाश छाब्रिया यांच्या नेतृत्वाखाली मुकुल माधव फाऊंडेशन शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांत सातत्याने कार्यरत आहे. समाजातील विविध घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी फाऊंडेशनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. अंगणवाडी नूतनीकरण प्रकल्प हा फाऊंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचा एक महत्त्वपूर्ण भाग असून, स्थानिक समुदाय आणि पालकांकडून या उपक्रमाचे विशेष स्वागत करण्यात येत आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, बालकांच्या आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात मिळणारे योग्य आणि पोषक वातावरण त्यांच्या भविष्यातील विकासाचा मजबूत पाया घडवते. सुरक्षित, स्वच्छ, आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणामुळे बालकांच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळते. त्यामुळे अंगणवाडी नूतनीकरणासारखे उपक्रम ग्रामीण भागातील बालशिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

## गणरायाच्या स्वागतासाठी रत्नागिरी नगरपरिषद सज्ज

(पान १ वरून)

मैदान आठवडा बाजार आदी ठिकाणी त्यांनी आपले स्टॉल टाकावेत. फुटपाथवर स्टॉल टाकण्यात येऊ नयेत. लोकांनी देखील फुटपाथवर रस्त्यावर गाड्या लावून अशा फळ विक्रेत्यांकडे फळे खरेदी करू नयेत. त्यामुळे वाहतूक कोंडी होऊ शकते. जी मैदाने दिली आहेत तिथे या सगळ्या फळ विक्रेत्यांनी आपला व्यवसाय करायचा आहे.

त्याचप्रमाणे शहरातील जे स्थानिक टपरी व्यावसायिक आहेत त्यांच्यासाठी चांगल्या दर्जाचे स्टॉल देण्यात येणार आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सगळ्या भागातील स्ट्रीट लाईट सुस्थितीत आहेत की नाही ते तपासले जात आहेत. जिथे लाईटची व्यवस्था नाहीये तिथे लाईटची सोय करण्यासाठी विद्युत विभागातील सगळे कर्मचारी रात्रंदिवस मेहनत करून स्ट्रीट लाईट सुरू करण्यात येत आहेत.

सगळ्या सार्वजनिक रस्ते, गल्ली, बोळ, समुद्रकिनारे आदी भागातील स्वच्छता करण्यात येत आहे. कुठेही रस्त्यावर कचरा दिसणार नाही याची खबरदारी घेतली जात आहे. गणपती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव निर्माण केला जाणार आहे. तसेच मांडवी समुद्रकिनाऱ्याव निर्माल्य संकलन कलश उभा केला जाणार आहे.

रत्नागिरीतील शहरातील नागरिकांना तसेच मुंबईवरून येणाऱ्या सर्व चाकरमान्यांना रत्नागिरी नगर परिषदेच्या वतीने शुभेच्छा दिल्या जात असून गणेशोत्सव सणासाठी नगर परिषदेच्या वतीने जय्यत तयारी केली असल्याची माहिती नगराध्यक्षा सौ. शिल्पाताई सुर्वे यांनी दिली आहे.

## राजापूर नगर परिषदेचे नगरसेवक सुबोध पवार...

(पान १ वरून)

उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात राजापूर पंचायत समितीचे माजी सभापती अभिजित तेली, राजापूर नगर परिषदेतील गटनेते - नगरसेवक जमीर खलिफ, युवासेना उपजिल्हा संतोष हातणकर, नगरसेवक सिद्धांत जाधव, उर्मिला बाकाळकर, अफरोज झारी, विभाग संघटक मीनाक्षी गुरव, संगीता चव्हाण, युवासेनेचे सुभाष नवाळे, प्रतीक्षा मांजरेकर तसेच विविध क्षेत्रातील पदाधिकारी, मान्यवर आणि स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.